# पंचायत समिती मंडणगड

## रत्नागिरी जिल्हा परिषद

## वार्षिक प्रशासन अहवाल

## सन २०१८-२०१९

## प्रस्तावना

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार दिनांक १/५/१९६२ पासून जिल्हा परिषद व पंचायत समिती अस्तित्वात आली.

सन २०११ चे शिरगणतीप्रमाणे मंडणगड तालुक्याची लोकसंख्या ६२१२३ आहे. तालुक्यात अहवाल वर्षात एकूण १०७ गावे असून ग्रामपंचायती एकूण ४९आहेत. त्यापैकी २३ स्वतंत्र व २६ ग्रुप ग्रामपंचायती आहेत. मंडणगड तालुक्याचे एकूण भौगोलीक क्षेत्र ४५१.२ चौ. किलो मिटर आहे. तालुका बहुतांशी डोंगराळ आहे. या तालुक्याला नैसर्गिक समुद्र किनारा लाभला आहे. त्यामुळे काही प्रमाणात मच्छिमार उद्योग केला जातो. परंतु तालुक्यातील लोकांचा शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. अहवाल वर्षात तालुक्यात १५६ प्राथमिक व २० माध्यमिक शाळा कार्यरत होत्या. प्राथमिक शाळांतील मुली व मुलांची संख्या ३८५८ व माध्यमिक शाळांतील मुली व मुलांची संख्या ४९७४ इतकी होती.

पंचायत समितीने अहवाल वर्षात हाती घेतलेल्या योजना व कामे या बाबतची विभागवार माहिती पुढीलप्रमाणे.

**१) अ) महाराष्ट्र ग्रामिण जिवनोन्नती अभियान :-**

या योजनेखाली सन २०१८/१९ या वर्षासाठी खेळते भांडवलाचे अंतिम उद्दीष्ट ४१५ गटांचे देण्यात आले होते. प्रत्यक्ष २४२ बचत गटांना खेळते भांडवल देणेत आलेले आहे.

सदर योजनेचा लाभ प्रत्यक्ष २४२ गटांना देण्यात आला. बँक अर्थसहाय्यचे उदिदष्ट २४२ गटांचे असून १७४ गटांना बँक अर्थसहाय्य वितरण करणेत आलेले आहे.

**२) महिला बालकल्याण विभाग :-**

सदर योजनेअंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे कार्यक्रम राबविण्यात आला.

| अ.क्र. | बाब | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | तांत्रिक व व्यावसायीक प्रशिक्षण देणे | १५ |
| २ | अंगणवाडी साहित्य पुरवणे | १४० |
| ३ | महिलांना घरघंटी पुरवणे | ०३ |

**३) अ) महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना :-**

महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंडणगड तालुक्यामध्ये जॉबकार्ड धारकांची नोंदणी संख्या १०,७२७ आहे. महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत नवीन ७५५ कामांना प्रशासकिय मंजूरी मिळाली असून नोंदणीकृत मजुरांकडून कामाची मागणीनुसार कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच मनुष्यदिन निर्मितीचे उदिदष्ट या गटासाठी ३३९२० एवढे होते. पैकी माहे मार्च २०१९ अखेर ३३१२९ एवढे मनुष्यदिन खर्च करणेत आले असून एकूण ९७.६७ टक्के साध्य करणेत आले आहे.

**ब) प्रधानमंत्री आवास योजना.**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात ३५ कामे हाती घेण्यात आली. पैकी २२ पूर्ण, व ०६ रद्द व ०७ कामे प्रगतीपथावर आहेत.

**४) आरोग्य विभाग.**

सन २०१८/१९ या आर्थिक वर्षात एकूण ३६१ कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेचे उद्दीष्ट देण्यात आले होते. त्यापैकी एकूण १३८ शस्त्रक्रिया करणेत आल्या असून काम ३८% साध्य करणेत आले.

**५) कृषि विभाग.**

**(१) राष्ट्रिय बायोगॅस योजना :-**

या योजनेखाली सन २०१८/१९ या वर्षासाठी १८ बायोगॅस बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. ते १८ बायोगॅस बांधून पूर्ण करण्यात आले.

**(२) बियाणे :-**

अहवाल वर्षात प्राप्त भात बियाणे एकूण ५३.५३ क्विंटल आहे. पैकी वाटप केलेले भात बियाणे ५३.५३ क्विंटल आहे. अहवाल वर्षाअखेर भात बियाणे शिल्लक नाही.

**(३) खते :-**

अहवाल वर्षात एकूण ५९ मे. टन खत प्राप्त झाले. पैकी ५९ मे. टन खत वाटप करणेत आले आहे.

**(४) शेतकरी मेळावे :-**

अहवाल वर्षात घेण्यात आलेल्या शेतकरी मेळाव्यांची संख्या ०२ आहे. सदर मेळाव्यापोटी प्राप्त रक्कम रुपये ५८,५००/- आहे. पैकी खर्च रक्कम रुपये ५८,५००/- इतके आहे.

**(६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना :-**

या योजनेअंतर्गत ४ लाभार्थी १०० टक्के अनुदानावर नविन विहीरी बांधणीकरीता अनुदान वाटप करण्यात आले. तसेच ४ लाभार्थींना १०० टक्के अनुदानावर विद्युत पंप वाटप करण्यात आले. या निविष्टा योजनेकरीता एकूण २२,२१,१५०/- खर्च करण्यात आले.

**७) ग्रामपंचायत विभाग.**

सन २०१८/१९ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत कराची मागणी रुपये १,७६,७२,६३३/- एवढी होती. पैकी रक्कम रुपये १,४५,७८,६२५/- एवढी रक्कम वसूल झालेली असून वसूलीचे प्रमाण ८२.४९ % एवढे आहे.

सन २०१८/१९ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत पाणीपट्टीची मागणी रुपये ७७,२२,४२५/- एवढी होती. पैकी रक्कम रुपये ५४,११,९४७/- एवढी रक्कम वसूल झालेली असून वसूलीचे प्रमाण ८६.६४% एवढे आहे, शिल्लक रक्कम रुपये १०,३१,६२९/- एवढी आहे.

**८) शिक्षण विभाग**

**अ) शालेय पोषण आहार.**

सन २०१८-१९ मध्ये या योजनेअंतर्गत इयत्ता १ ते ५ वी च्या वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला प्रतिदिन साधारणत: १०० ग्रॅम प्रमाणे तांदुळ शिजवून अन्न वाटप करण्यात आले. तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी च्या वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला प्रतिदिन १५० ग्रॅम याप्रमाणे तांदुळ शिजवून अन्न वाटप करण्यात आले. इयत्ता १ ते ५ वी च्या वर्गातील ३१७० व इयत्ता ६ वी ते ८ वी च्या वर्गातील २१४३ विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

**ब) मागासवर्गीय मुलींना उपस्थिती दाखला.**

प्राथमिक शाळांमधील मागासवर्गीय मुलींची उपस्थिती वाढावी यासाठी इयत्ता १ ते ४ मधील प्रत्येक विद्यार्थीनीला दरदिवशी १/- रुपया प्रमाणे ७५ % उपस्थिती असणा-या मुलींना उपस्थिती भत्ता देण्यात आला. सन २०१८-१९ मध्ये एकूण १०३ मुलींना भत्ता वाटप करण्यात आला.

**९) पशुसंवर्धन विभाग.**

सन २०१८-१९ मध्ये वैरण विकास योजनेअंतर्गत १०० टक्के अनुदानावर एकूण ५०० किलो मका बियाणे ५० शेतक-यांना वाटप करण्यात आले. विशेष घटक योजनेअंतर्गत ७५% अनुदानावर २ दुधाळ जनावरांचा गट ४ शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. ए. कु. वि. योजनेअंतर्गत ५० % अनुदानावर १०० पिल्ले पुरवठा व खाद्य पुरवठा ०५ शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. विशेष घटक योजनेअंतर्गत ७५ % अनुदानावर १० शेळया व १ बोकड ४ शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. जि. प. सेस ५०% अनुदानावर ०१ दुधाळ जनावरांचा गट १० शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले.

**पंचायत समिती मंडणगड**

**पंचायत समितीची स्थापना व रचना.**

१) विद्यमान पंचायत समिती ज्या तारखेला स्थापन झाली ती तारीख : १४/०३/२०१७

२) रचना :-

| | | |
|---|---|---|
| अ) | गटातून निवडून आलेल्या किंवा स्विकृत केलेल्या आणि त्या विभागात राहणा-या जिल्हा परिषदेच्या सदस्यांची संख्या | २ |
| ब) | ज्या गटातील निर्वाचन गणातून (इलेक्ट्रोलर कॉलेजातून) प्रत्यक्ष निवडलेल्या सभासदांची संख्या. | ४ |
| क) | स्विकृत सदस्यांची संख्या व स्विकृत करुन घेतल्याची तारीख | निरंक |
| ड) | सदस्यांची एकूण संख्या | ४ |
| इ) | सहभागी सदस्यांची एकूण संख्या | निरंक |

३) वर्षभरातील राजीनामे, सदस्यांना पदावरुन दूर करणे किंवा आकस्मिकरित्या त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागा कोणत्याही असल्यास आणि त्या भरण्याकरिता केलेली उपाययोजना. निरंक

४) सभापती आणि उपसभापती यांची निवडणूक :-

**अ) सभापती यांची निवडणूक :-** दिनांक १४/०३/२०१७ ते अद्यापपर्यंत

| अ.क्र. | पद | उमेदवाराचे नावं | प्रत्येकांना मिळालेली मते | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | सभापती | श्री. आदेश अरविंद केणे | ०२ | चिठ्ठी टाकून |

**अ) उपसभापती यांची निवडणूक** तारीख :- १४/०३/२०१७ ते अद्यापपर्यंत

| अ.क्र. | पद | उमेदवाराचे नांव | प्रत्येकांना मिळालेली मते | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | उपसभापती | श्रीम. स्नेहा सचिन सकपाळ | ०२ | चिठ्ठी टाकून |

५) सभापती आणि उपसभापती यांचे वर्षभरातील राजीनामे, त्यावरील अविश्वासाचा प्रस्ताव व त्यास पदावरुन दूर करणे आणि तसे केले असल्यास अनुषंगिक व्यवस्था. निरंक

६) सभापती आणि उपसभापती यांचेकरिता केलेला खर्च.

| अ.क्र. | बाब | सभापती | उपसभापती |
|---|---|---|---|
| १ | मानधन रुपये | १२००००/- | ९६०००/- |
| २ | घरभाडे भत्ता | ४८००/- | -- |
| ३ | प्रवास भत्ता | १४२५०/- | ९९००/- |

**प्रकरण ३ रे** **पंचायत समिती मंडणगड** **सन - २०१८-१९**

**कार्यकारी अधिकारी आणि सेवा**

**पंचायत समितीच्या सेवेत पाठविलेले राज्य शासनाचे अधिकारी**

| अ.क्र. | पदनाम | नावं | कालावधी | श्रेणी | पदस्थापना | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कोणाकडून | कोणाकडे |
| १ | गटविकास अधिकारी (उ.श्रे.१) | श्री. ए. ए. धरणगुत्तीकर | ०१/०४/२०१८ ते ३१/५/२०१८ | प्रथम | शासनाकडून | जि.प.कडे |
| | गटविकास अधिकारी (उ.श्रे.१) प्रभारी | श्री. अरुण गणपत जाधव | ०१/०६/२०१८ ते ०५/०८/२०१८ | व्दितीय | जि.प.कडून | |
| | गटविकास अधिकारी (उ.श्रे.१) | श्री. आर. एम. दिघे | ०६/०८/२०१८ ते ३१/०३/२०१९ | प्रथम | शासनाकडून | |
| २ | सहा.गटविकास अधिकारी (प्रभारी) | श्री. आर. टी. घावट | ०१/०४/२०१८ ते २१/१०/२०१८ | व्दितीय | जि.प.कडून | जि.प.कडे |
| | सहा.गटविकास अधिकारी | श्री. आय. बी. पवार | २२/१०/२०१८ ते ३१/०३/२०१९ | व्दितीय | शासनाकडून | |
| ३ | गटशिक्षण अधिकारी | प्रभारी श्री. रामचंद्र विठठल सांगडे | ०१/०४/२०१८ ते ३१/३/२०१९ | तृतीय | जि.प.कडून | जि.प.कडे |
| ४ | पशुधन विकास अधिकारी विस्तार मंडणगड | डॉ. श्री. आर.एस.जायभाये | ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ | प्रथम | शासनाकडून | जि.प.कडे |
| ५ | पशुधन विकास अधिकारी मंडणगड | डॉ. श्री. आर.एस.जायभाये | ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ | प्रथम | शासनाकडून | जि.प.कडे |
| ६ | पशुधन विकास अधिकारी लाटवण | डॉ. श्री. आर.एस.जायभाये | ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ | प्रथम | शासनाकडून | जि.प.कडे |
| ७ | उपअभियंता (प्र.) जि. प. लपांब उपविभाग मंडणगड | श्री. विष्णू प्रल्हाद पवार | ०१/०४/२०१८ ते ०३/१०/२०१८ | व्दितीय | जि.प.कडून | जि.प.कडे |
| | उपअभियंता जि. प. लपांब उपविभाग मंडणगड | श्रीम. प्रतिभा मधुकर शेरकर | ०४/१०/२०१८ ते ३१/०३/२०१९ | प्रथम | शासनाकडून | |
| ८ | बाल विकास प्रकल्प अधिकारी (प्रभारी) | श्रीम. आर. ए. सावरकर | ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ | तृतीय | जि.प.कडून | जि.प.कडे |
| ९ | तालुका आरोग्य अधिकारी | डॉ. श्री. डि.एल.चरके | ०१/०४/२०१८ ते १९/०७/२०१८ | प्रथम | शासनाकडून | जि.प.कडे |
| | तालुका आरोग्य अधिकारी (प्रभारी) | डॉ. श्री. पी. एस. भावठणकर | २०/०७/२०१८ ते ३१/०५/२०१९ | प्रथम | जि.प.कडून | |
| १० | वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र पणदेरी (प्रभारी) | प्रभारी डॉ. श्री. डि. एल. चरके | ०१/०४/२०१८ ते १९/०७/२०१८ | प्रथम | जि.प.कडून | जि.प.कडे |
| | वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र पणदेरी (प्रभारी) | डॉ. श्री. पी. एस. भावठणकर | २०/०७/२०१८ ते ३१/०३/२०१९ | प्रथम | शासनाकडून | |
| ११ | वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र देव्हारे | प्रभारी डॉ. श्री. आर. एस. पुंगळे | ०१/०४/२०१८ ते १३/१२/२०१८ | प्रथम | शासनाकडून | जि.प.कडे |
| | वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र देव्हारे | डॉ. श्री. ए. व्ही. सानप | १४/१२/२०१८ ते ३१/०३/२०१९ | व्दितीय | जि.प.कडून | |
| १२ | वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र कुंबळे | डॉ. श्री. एस.आर.सुर्यवंशी | ०१/०४/२०१८ ते २०/०७/२०१८ | प्रथम | शासनाकडून | जि.प.कडे |
| | वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र कुंबळे (प्रभारी) | डॉ. श्री. आर. एस. पुंगळे | २१/०७/२०१८ ते १३/१२/२०१८ | प्रथम | जि.प.कडून | |
| | वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र कुंबळे | डॉ. श्री. वाय. डी. राठोड | १४/१२/२०१८ ते ३१/०३/२०१९ | व्दितीय | जि.प.कडून | |

**प्रकरण ३ रे** **पंचायत समिती मंडणगड** **सन- २०१८-१९**

**कार्यकारी अधिकारी आणि सेवा**

**२) गटांतच पदस्थापित केलेले जिल्हा परिषदेचे सेवक**

**गटांतच पदस्थापित केलेले जिल्हा परिषदेचे सेवक (कॉलम क्रमांक १ ते १७ ) तक्ता क्रमांक ३**

| अ. क्र. | विभाग | कलम २४३ अन्वये प्रारंभिची मंजूर केलेली संख्या | | | वर्षाच्या सुरुवातीची प्राधिकृत संख्या | | | वर्षाअखेरची प्राधिकृत संख्या | | | संपूर्ण वर्षात रिकाम्या असलेल्या जागा | | | सहा महिन्यापेक्षा अधिक मुदतीपर्यंत रिकाम्या असलेल्या संख्या | | | सहा महिन्यापेक्षा कमी मुदतीपर्यंत रिकाम्या असलेल्या संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| १ | पंचायत समिती | ०१ | १६ | ०५ | ०१ | ११ | ०४ | ०१ | ११ | ०४ | -- | ०५ | ०१ | -- | ०५ | ०१ | -- | -- | -- |
| २ | अर्थ विभाग | -- | ०४ | -- | -- | ०४ | -- | -- | ०४ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३ | शेती विभाग | ०४ | -- | -- | ०४ | -- | -- | ०२ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | -- | ०१ | -- | -- |
| ४ | शिक्षण विभाग | ०३ | ०४ | ०५ | ०२ | ०३ | ०३ | ०२ | ०४ | ०३ | ०१ | -- | ०२ | ०१ | -- | ०२ | -- | -- | -- |
| ५ | शिक्षण विभाग (प्रा) | -- | ४२७ | -- | -- | ३४३ | -- | -- | ३७३ | -- | -- | ५७ | -- | -- | २१ | -- | -- | ३६ | -- |
| ६ | पंचायत विभाग | ०१ | ४३ | -- | ०१ | ३८ | -- | -- | ३६ | -- | -- | ०७ | -- | -- | ०७ | -- | ०१ | -- | -- |
| ७ | पशुसंवर्धन विभाग | ०३ | -- | ०७ | ०३ | -- | ०५ | ०२ | -- | ०५ | -- | -- | ०५ | -- | -- | -- | ०१ | -- | -- |
| **एकूण** | | **१२** | **४९४** | **१७** | **११** | **३९९** | **१२** | **७** | **४२८** | **१२** | **०१** | **६९** | **८** | **०२** | **३३** | **०३** | **०३** | **३६** | **००** |

**प्रकरण ३ रे** **पंचायत समिती मंडणगड** **सन - २०१८-१९**

**कार्यकारी अधिकारी आणि सेवा**

**२) गटांतच पदस्थापित केलेले जिल्हा परिषदेचे सेवक**

| अ. क्र. | विभाग | कलम २४३ अन्वये प्रारंभिची मंजूर केलेली संख्या | | | वर्षाच्या सुरुवातीची प्राधिकृत संख्या | | | वर्षाअखेरची प्राधिकृत संख्या | | | संपूर्ण वर्षात रिकाम्या असलेल्या जागा | | | सहा महिन्यापेक्षा अधिक मुदतीपर्यंत रिकाम्या असलेल्या संख्या | | | सहा महिन्यापेक्षा कमी मुदतीपर्यंत रिकाम्या असलेल्या संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ | तांत्रिक वर्ग ३ | बिगर तांत्रिक वर्ग ३ | वर्ग ४ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| १ | ग्रापापु विभाग युनिट मंडणगड | ७ | ३ | ३ | २ | २ | २ | २ | २ | २ | ५ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २ | ए. बा. वि. से. योजना मंडणगड | ५ | २ | १ | ५ | १ | १ | ५ | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३ | तालुका आरोग्य अधिकारी ता. मंडणगड | ४१ | ४ | १६ | ३३ | ४ | ९ | ३५ | ३ | ९ | ६ | १ | ७ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ४ | बांधकाम विभाग | सदरची आस्थापना दापोली गटाकडे आहे. | | | | | | | | | | | | | | | | | |

## पंचायत समिती मंडणगड
## गटअनुदाने, अंदाजपत्रक आणि हिशेब

### १. पंचायत समितीला मिळालेल्या रकमा

| अ.क्र. | अनुदानाचे स्वरुप | राज्य शासनाकडून मिळालेले आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | सामुहिक विकास अनुदाने | निरंक |
| २ | स्थानिक विकास कामांची अनुदाने | निरंक |
| ३ | इतर गट अनुदाने (सेस अनुदान) मागील शिल्लकेसह | २४,७४,०९० |
| ४ | जिल्हा परिषदेकडून मिळालेले आर्थिक सहाय्य | निरंक |
| ५ | गट अनुदाने | निरंक |
| ६ | जिल्हा परिषदेकडून होणारा खर्च करणेसाठी (विभागवार) | निरंक |
| ७ | पंचायत समितीकडे जमा झालेल्या इतर रकमा (उत्तेजनार्थ) | निरंक |
| | अ) अल्पबचत अनुदान (मागील शिल्लकेसह) | |

**पंचायत समिती मंडणगड**

**२. पंचायत समितीचे अंदाजपत्रक**

| अ. क्र. | मुख्य शिर्ष | अहवाल वर्षातील प्राथमिक अंदाज | | | त्या वर्षातील पुरवण्या व फेर तपासणी आणि केलेले पुर्नविनियोजन | | | अंतिम वाटप | | | प्रत्यक्ष खर्च | | | पुढील वर्षाकरिता अर्थ संकल्पीय तरतुद | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरकारी | जि. प. | पं.स. | सरकारी | जि. प. | पं.स. | सरकारी | जि. प. | पं.स. | सरकारी | जि. प. | पं.स. | सरकारी | जि. प. | पं.स. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| १ | १ अध्यक्ष | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | २ सामान्य प्रशासन | ० | ० | २५०००० | ० | ० | ४१८००० | ० | ० | ४१०००० | ० | ० | ४१७७६६ | ० | ० | ३००००० |
| ३ | ३ शिक्षण | ० | ० | ३०००० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३०००० |
| ४ | ४ इमारती व दळणवळण | ० | ० | ७००००० | ० | ० | २२०६८०५ | ० | ० | २२०६८०५ | ० | ० | ३८९२६२ | ० | ० | ७००००० |
| ५ | ५ पाट बंधारे | ० | ० | ३००००० | ० | ० | १००००० | ० | ० | १००००० | ० | ० | ४०००० | ० | ० | ३००००० |
| ६ | ६ वैद्यकिय | ० | ० | ५०००० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | ८ सार्व.आरोग्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५०००० |
| ८ | ९ सार्व.आरो.अभि. | ० | ० | ५०००० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | ११ कृषि | ० | ० | १००००० | ० | ० | ४७००० | ० | ० | ४७००० | ० | ० | ४६९९९ | ० | ० | १००००० |
| १० | १२ पशुसंवर्धन | ० | ० | ३०००० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३०००० |
| ११ | १४ समाजकल्याण् | ० | ० | ४४०००० | ० | ० | १०६१९०५ | ० | ० | १०६१९०५ | ० | ० | ८२६९०५ | ० | ० | ४४०००० |
| १२ | १८ म.बा.क. | ० | ० | २२०००० | ० | ० | ५२९४४७ | ० | ० | ५२९४४७ | ० | ० | १९०००४ | ० | ० | २२०००० |
| १३ | २० संकीर्ण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १४ | ३ % अपंग | ० | ० | ६६००० | ० | ० | २६८००० | ० | ० | २६८००० | ० | ० | १६८००० | ० | ० | ११०००० |
| एकूण | | ० | ० | २२३६००० | ० | ० | ४६३११५७ | ० | ० | ४६३११५७ | ० | ० | २०७८९३६ | ० | ० | २२८०००० |

## पंचायत समिती स्वत:चे अंदाजपत्रकातून ज्यांची वित्त व्यवस्था करते अशी कामे

| अ. क्र | मुख्य शिर्ष | प्रारंभी मंजूरी | | | फेरबदल केल्यानंतर मंजूरी | | | प्रत्यक्ष खर्च केलेली | | | ३ व ४ मधील फरक | | | फरकाची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरकारी | जि. प. | पं.स. | सरकारी | जि. प. | पं.स. | सरकारी | जि. प. | पं.स. | सरकारी | जि. प. | पं.स. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** | **१३** | **१४** | **१५** |
| १ | १ अध्यक्ष | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| २ | २ सा.प्रशासन | ० | ० | ४१८००० | ० | ० | ४१८००० | ० | ० | ४१७७६६ | ० | ० | २३४ | शिल्लक अत्यप्ल आहे. |
| ३ | ३ शिक्षण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ४ | ४ इमा व दळण. | ० | ० | २२०६८०५ | ० | ० | २२०६८०५ | ० | ० | ३८९२६२ | ० | ० | १८१७५४३ | देयकाप्रमाणे खर्च |
| ५ | ५ पाटबंधारे | ० | ० | १००००० | ० | ० | १००००० | ० | ० | ४०००० | ० | ० | ६०००० | देयकाप्रमाणे खर्च |
| ६ | ६ वैद्यकिय | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ७ | ८ सार्व.आरोग्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ८ | ९ सार्व.आरो.अभि. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | शिल्लक अत्यप्ल आहे. |
| ९ | ११ कृषि | ० | ० | ४७००० | ० | ० | ४७००० | ० | ० | ४६९९९ | ० | ० | ० | |
| १० | १२ पशुसंवर्धन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ११ | १४ समाजकल्याण् | ० | ० | १०६१९०५ | ० | ० | १०६१९०५ | ० | ० | ८२६९०५ | ० | ० | २३५००० | देयकाप्रमाणे खर्च |
| १२ | १८ म.बा.क. | ० | ० | ५२९४४७ | ० | ० | ५२९४४७ | ० | ० | १९०००४ | ० | ० | ३३९४४३ | देयकाप्रमाणे खर्च |
| १३ | २० संकीर्ण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १४ | ३ % अपंग | ० | ० | २६८००० | ० | ० | २६८००० | ० | ० | १६८००० | ० | ० | १००००० | देयकाप्रमाणे खर्च |
| **एकूण** | | **०** | **०** | **४६३११५७** | **०** | **०** | **४६३११५७** | **०** | **०** | **२०७८९३६** | **०** | **०** | **२५५२२२१** | |

**प्रकरण ५ वे** **सन २०१८-१९**

## पंचायत समिती मंडणगड

## पंचायत समितीच्या कामकाजावरील संक्षिप्त अहवाल

| अ. क्र. | ठराव क्र. | तारीख | विषय |
|---|---|---|---|
| १ | ७९ | २१/०४/२०१८ | अभिनंदन ठरावा बाबत जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग दापोली युनिट मंडणगड चे सन २०१७-१८ चे उद्दीष्ट १००% पूर्ण केले बाबत. |
| २ | ८२ | २१/०४/२०१८ | पंचायत समिती मंडणगड सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील लेखा परिक्षण प्रथम पूर्तता अहवाल वाचन |
| ३ | ९२ | २३/०५/२०१८ | पंचायत समिती मंडणगड सेस सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार अखर्चित असलेली रक्कम योजनेनुसार व कामानुसार वाचून दाखविण्यात आली व त्या वाचून दाखविण्यात आलेल्या आराखड्यास सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात खर्च करण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. |
| ४ | ९९ | २०/०७/२०१८ | प्राथमिक आरोग्य केंद्र पणदेरी अंतर्गत उपकेंद्र पालवणी येथील आरोग्य सेवक व आरोग्य सेविका रिक्त पदे भरणे बाबत. |
| ५ | १०९ | १६/०८/२०१८ | ग्रामपंचायत कुडूक खुर्द येथील नळपाणी पुरवठा योजनेची उद्भव विहीरीच्या नुकसानी बाबत. |
| ६ | ११४ | १२/०९/२०१८ | पंचायत समिती वाढीव उपकर वार्षिक लेखा सन २०१७-१८ प्रपत्र २१ (सी) डी वरील वित्त समितीने अभिप्राय पूर्तता करणे बाबत. |
| ७ | १२४ | १४/११/२०१८ | मंडणगड तालुक्यातील मग्रारोहयो अंतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये अंदाजित ५३५६७ मनुष्यदिन आवश्यक असून त्यावरील १५१०००००/- रुपये इतका खर्च होणे अपेक्षित आहे. तरी सदर नियोजन आराखडयाचे परिशिष्ट-अ व परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब यांस मंजूरी मिळणेबाबत. |
| ८ | १२७ | १२/१२/२०१८ | मंडणगड तालुक्यातील रस्त्यांवर पडलेले खड्डे भरणे बाबत. |
| ९ | १३० | ०९/०१/२०१९ | सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामधील जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या व यश संपादित केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदना बाबत. |
| १० | १३६ | ०६/०२/२०१९ | ग्रामपंचायत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे बाबत. |
| ११ | १३७ | ०६/०२/२०१९ | पंचायत समिती सेस सन २०१८-१९ चे सुधारित व सन २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी देणे बाबत. |
| १२ | १४४ | ०५/०३/२०१९ | जिल्हा परिषद शाळा पडवे नं.१ तालुका मंडणगड शाळेची इमारत निर्लेखन करण्यास अनुमती देणे बाबत. |

**प्रकरण ५ वे**

**पंचायत समिती मंडणगड**

**सन २०१८-१९**

**पंचायत समितीच्या सभासदांसाठी येणारा खर्च**

| **अ. क्र.** | **तपशिल** | **पुर्तता** |
|---|---|---|
| १ | सदस्यांची संख्या | ४ |
| २ | भरविलेल्या सभांची संख्या | १२ |
| ३ | गणपुर्तीच्या अभावी तहकुब सभांची संख्या | ४ |
| ४ | सरासरी उपस्थिती | ४ |
| ५ | सभापती उपसभापती खेरीज करुन सदस्यांचा प्रवास भत्ता | २८८००/- |
| ६ | सभांचा इतर खर्च | ९२७७२/- |
| ७ | एकूण खर्च | १२१५७२/- |

**प्रकरण ६ वे** **पंचायत समिती मंडणगड** **सन २०१८-१९**

**पंचायत समिती स्वत:चे अंदाजपत्रकातून ज्यांची वित्त व्यवस्था करते अशी कामे**

| अ. क्र. | लेखशिर्ष | मंजूर अनुदान | प्रत्यक्ष झालेला खर्च | (-) कमी | अधिक | तफावतीची तपशिलवार कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ अध्यक्ष | ० | ० | ० | | |
| २ | २ सामान्य प्रशासन | ४१८००० | ४१७७६६ | २३४ | | शिल्लक अत्यप्ल आहे. |
| ३ | ३ शिक्षण | ० | ० | ० | | |
| ४ | ४ इमारती व दळणवळण | २२०६८०५ | ३८९२६२ | १८१७५४३ | | देयकाप्रमाणे खर्च |
| ५ | ५ ल.पा.ब. | १००००० | ४०००० | ६०००० | | देयकाप्रमाणे खर्च |
| ६ | ६ वैदयकिय | ० | ० | ० | | |
| ७ | ८ सार्व. आरोग्य | ० | ० | ० | | |
| ८ | ११ शेती | ४७००० | ४६९९९ | ०१ | | शिल्लक अत्यप्ल आहे. |
| ९ | १२ पशूसंवर्धन | ० | ० | ० | | |
| १० | १४ समाजकल्याण | १०६१९०५ | ८२६९०५ | २३५००० | ० | देयकाप्रमाणे खर्च |
| ११ | १८ महिला व बालकल्याण | ५२९४४७ | ३८०७० | ३३९४४३ | | देयकाप्रमाणे खर्च |
| १२ | २० संकीर्ण | ० | ० | ० | | |
| १३ | ३% अपंग | २६८००० | १६८००० | १००००० | | देयकाप्रमाणे खर्च |
| | एकूण | **४६३११५७** | **२०७८९३६** | **२५५२२२१** | | |

## पंचायत समिती मंडणगड

जिल्हा परिषदेकडून कार्यान्वित करणेत आलेल्या योजना व कामे राज्य शासनाने नेमून दिलेल्या अटी व नियम यांस पात्र राहून पंचायत समितीने पार पाडल्या आहेत.

## परिशिष्ट (अ)
## गटातील ग्रामपंचायतीचे कामावरील अहवाल

गटातील ग्रामपंचायतीच्या कामकाजावरील अहवालाची माहिती प्रशासन अहवालाचा भाग-१ मधील जि.प. च्या अहवालात (प्रकरण-१५) नमूद करण्यात आलेली असल्याने ती या ठिकाणी पुन्हा देण्यात आलेली नाही.

### नमुना क्र.१

पंचायत समितीची संबंधित प्रलंबित लेखापरिक्षण आक्षेप वर्षाअखेर पूर्वी मिळालेल्या लेखा परिक्षण अधिनियम १९३० ९(अ) (ब) आणि (क) खालील आक्षेपांची माहिती

| अ.क्र. | लेखापरिक्षण अहवालाचे वर्ष | वर्ष अखेरीस प्रलंबित लेखापरिक्षण आक्षेप |
|---|---|---|
| १ | २००५-२००६ | ०१ |
| २ | २०११-२०१२ | ०२ |
| ३ | २०१२-२०१३ | ०२ |
| ४ | २०१४-२०१५ | ०३ |
| ५ | २०१५-२०१६ | ०७ |
| ६ | २०१६-२०१७ | २४ |
| | एकूण | ३९ |

प्रकरण ७ वे नमुना नं. २ २०१८-१९

**वर्षात मिळालेल्या लेखा परिक्षण अहवालानुसार महत्वाचे आक्षेप व त्यावर पंचायत समितीने दिलेली उत्तरे**
**(मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० कलम ९ (अ) आक्षेप बाबत माहिती) स्थानिक निधी लेखा प्रथम पुर्तता अहवाल सन २०१७/१८**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>लेखापरिक्षण अहवालातील तपशील</th><th>थोडक्यात आक्षेप</th><th>पंचायत समितीची उत्तरे</th></tr>
<tr><td>१</td><td>परिच्छेद क्र. ८</td><td>एकात्मिक कुक्कुट विकास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना पिल्ले व खाद्य पुरवठा करणे रक्कम अदा करण्यात आले बाबत अनियमितता पुढीलप्रमाणे आहे.<br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रमाणक क्रमांक</th><th>दिनांक</th><th>रक्कम</th><th>तपशील</th></tr>
<tr><td>१</td><td>६५</td><td>३१/०३/२०१८</td><td>२००००/-</td><td>नाविण्यपूर्ण योजना अंडी उबवणूक केंद्र चिपळूण एकूण लाभार्थिंची संख्या १० प्रती १०० पिल्ले वाटप प्रती लाभार्थी रक्कम २०००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>६४</td><td>३१/०३/२०१८</td><td>६००००/-</td><td>प्रती लाभार्थ्यांना २०००/- या प्रमाणे रक्कम रुपये अदा करण्यात आलेले आहेत.</td></tr>
</table>
<br>पशुसंवर्धन विभागाने वरील खर्च हा जिल्हा परिषद योजनेतून केलेला आहे. त्यावरील अनियमितता पुढीलप्रमाणे आहेत.<br>१. लाभार्थ्यांना प्रत्यक्ष पिल्लांना पुरवठा करण्यापूर्वी १ दिवसाचे कुक्कुट विषयक प्रशिक्षण देण्यात यावे तसे करण्यात आलेले नाही. संबंधित लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिले किंवा कसे याबाबत खुलासा करावा.<br><br>२. कुक्कुट पक्षांसाठी निवारा खाद्य व पाण्याची भांडी विद्युत पुरवठा इत्यादी सर्व मुलभूत सुविधा असल्याबाबत पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही याबाबत योग्य तो खुलासा करावा.<br><br>३. मास्टर नोंदवही गावनिहाय नोंदवही ठेवण्यात आलेल्या नाहीत त्या ठेवून पूर्तता करावी. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९ दिनांक २०/०६/२००८ जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेचे नियोजन व अंमलबजावणी परिशिष्ठ "इ"नुसार करण्याचे आहे. परंतु सदर योजनेबाबत तशी कार्यवाही केलेली नाही. तरी यापुढे तशी दक्षता घ्यावी.</td><td>१.लाभार्थ्यांना प्रत्यक्ष पिल्लांना पुरवठा करण्यापूर्वी १ दिवसाचे कुक्कुट विषयक प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. त्याची सत्यप्रत सोबत जोडण्यात येत आहे.<br>२. कुक्कुट पक्षांसाठी निवारा खाद्य व पाण्याची भांडी विद्युत पुरवठा इत्याइी सर्व मुलभूत सुविधा असल्याबाबत पडताळणी अहवाल परिच्छेदासोबत जोडण्यात येत आहे.<br>३. मास्टर नोंदवही ठेवण्यात आली असून त्याची सत्यप्रत सोबत जोडण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९ दिनांक २०/०६/२००८ जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेचे नियोजन व अंमलबजावणी परिशिष्ट "इ" नुसार ठेवण्यात येत आहे. तरी याबाबतची दक्षता घेण्यात येत आहे.<br>तरी सदर परिच्छेद वगळण्यास विनंती आहे.</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| २ | परिच्छेद क्र. १३ | सिंचन विहीरीच्या पंप सेट खरेदी मधील अनियमितता बाबत.<br>विशेष घटक योजना लेखाशिर्ष २२२५ (अ) अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजने मार्फत पंचायत समिती मंडणगड येथील ७ मजूर लाभधारकांसाठी नविन सिंचन विहीरीचा लाभ देणे करीता खालीलप्रमाणे वित्त प्रेषण नुसार अनुदान रक्कम प्राप्त झालेली आहे.<br>१. सिंचन विहीर खोदाई १७५०००० (रक्कम रुपये - २५००००/- प्रती लाभधारक)<br>२. विज जोडणी रक्कम रुपये ७००००/- (रक्कम रुपये - १००००/- प्रती लाभधारक)<br>३. पंप खरेदी रक्कम रुपये १७५०००(रक्कम रुपये - २५०००/- प्रती लाभधारक)<br>एकूण अनुदान प्राप्त रक्कम रुपये १९९५०००/- वित्तीय वर्ष २०१७-२०१८ अखेर ७ मजूर लाभधारकांच्या विहीरीचे कामे दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर अपूर्ण अवस्थेत आहेत. सिंचन विहीर खोदाई कामाकरीता दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर रक्कम रुपये ५७३३५२/-इतकी रक्कम खर्च पडलेली आहे.<br>सदर ७ ही सिंचन विहीरीची कामे प्राथमिक अवस्थेत अपूर्ण असतांना ७ ही लाभधारकांनी मोटर पंप खरेदी केलेली असून मंजूर अनुदान रक्कमेपैकी रक्कम रुपये १६३०००/- खर्च केलेली आहे.<br>याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. | |
| | | १. ५ लाभधारकांना रक्कम रुपये २३१००/- रु. प्रती पंप खरेदी रक्कम नुसार मोटर पंप खरेदी केलेले आहे. एका लाभधारकाने मोटर पंप रक्कम रु. २२५००/- प्रमाणे खरेदी केलेले आहे. उर्वरीत एका लाभधारकाने मोटर पंप २५०००/- रु. प्रमाणे खरेदी केलेले आहे. त्यानुसार प्रमाणक क्र. ६४ दिनांक ३१/०३/२०१८ अन्वये ७ लाभधारकांनी रक्कम रु. १६३०००/- अदागई केलेली आहे. मंजूर तरतूद रक्कम रुपये १७५०००/- पैकी अखर्चीत रक्कम रुपये १२०००/- शासन खाती जमा करून लेखा परीक्षणास पुर्तता अनुपालन दर्शवावी. | १. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजने अंतर्गत सन २०१७-२०१८ मध्ये मंडणगड गटात ७ लाभार्थींची निवड झालेली आहे. त्याचप्रमाणे वित्तीय वर्षात ७ लाभार्थ्यांनी मंजूर आराखडयानुसार पंप संच खरेदी केलेले असून त्यांना थेट अनुदान प्रणाली प्रमाणे खरेदी करण्यासाठी मा. संचालक विस्तार व प्रशिक्षण कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे व मा. कृषि विकास अधिकारी यांनी दिलेल्या सर्व संमतीने व कार्यालयाकडील मंजूर टिप्पणी नुसार २५०००/- रुपयांच्या मर्यादेत खरेदी करण्यासाठी मंजूरी देण्यात आली होती. त्यानुसार पाच लाभार्थ्यांनी पंप संचाची खरेदी डि बी. टी. मार्फत केली आहे. व तसेच मंजूर केलेल्या पावत्यानुसारच संबंधीत लाभार्थ्यांच्या खात्यात २५०००/- च्या मार्यादेत पैसे जमा करण्यात आले आहे.<br>तरी पंप सेट खरेदी बाबतच्या झेरॉक्स प्रती सोबत जोडण्यात येत आहे. |
| | | २. सिंचन विहीरीचे काम दिनांक ३१ मार्च २०१८ पर्यंत अपूर्ण अवस्थेत असतांना व विद्युत जोडणीची कामे झालेली नसतांना मोटर पंप खरेदी करण्याचा हेतू समजलेला नाही.<br>सिंचन विहीर खोदाई पूर्ण कार्यान्वीत होण्याआधी पंप खरेदी केल्याने पंपाचा प्रत्यक्ष उपयोग मात्र सिंचन विहीर पूर्ण झाल्याशिवाय करता येणे शक्य नाही. तथापी पंपाची गॅरेंटी वॉरंटी खरेदी तारखेपासून | २. सिंचन विहीरींची कामे मार्च २०१८ पर्यंत खोदाई पूर्ण झाल्यामुळे व शासनाचा मंजूर निधी परत जावू नये या हेतूने व मंजूर पॅकेज प्रमाणे लाभार्थींना पंप संच खरेदीवर थेट अनुदान त्यांचे बॅक खाती जमा करणेत आलेले आहेत. त्यामुळे गॅरंटी वॉरंटीची मुदत संपलेवर तांत्रिक दोष |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रत्यक्ष पंपाच्या उपयोगापूर्वीच संपूष्टात येईल व भविष्यात पंप कार्यान्वीत होतेवेळी काही तांत्रीक दोष उद्भवल्यास लाभधारकांस प्रत्यक्ष लाभ होणार नाही. त्यामुळे सदरची खर्च रक्कम तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे. | उद्भवल्यास त्याची जबाबदारी संबंधीत लाभार्थ्यांवरच राहणार आहे. सिंचन विहीरी मार्च २०१८ अखेर अपूर्ण असल्यामुळे त्या सन २०१८-२०१९ मध्ये पूर्ण करण्यासाठी मा. अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. रत्नागिरी यांचे आदेश क्र. रजिप/कृषि/बा.आ.कृ.स्वा.यो./मुदतवाढ/१८६/२०१८ दिनांक ३१/०५/२०१८ अन्वये मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सन २०१८-२०१९ मध्ये विहीरीची कामे पूर्ण करण्यात आलेली आहे.<br>सदरहू परिच्छेद वगळणेस विनंती आहे. |
| ३ | परिच्छेद क्र. १६ | ग्रामपंचायतीकडील थकीत पाणीपट्टी वसुलीबाबत.<br>पंचायत समिती मंडणगडचे सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाचे ग्रामपंचायत विभागागडील पाणीपट्टी वसुलीची नोंदवही तपासली असता सोबत जोडलेले परिशिष्टामध्ये दर्शविलेप्रमाणे सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाचे एकुण पाणीपट्टी मागणी रक्कम रुपये - ७१३९८३८/- एवढी असुन सन २०१७-२०१८ अखेर वसुली रक्कम रुपये १८२९०८७/- एवढी मोठ्या प्रमाणात थकीत आहे.<br>तरी तालुक्यातील नळपाणीपुरवठा योजना राबविण्याऱ्या सर्व ग्रामपंचायतींकडून पाणीपुरवठा योजनावर येणारा खच्र व घसारा निधी विचारात घेऊन पाणीपट्टी मागणी करण्यात येत आहे किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात यावी व थकीत पाणीपट्टी १००% वसुली होण्याचे दृष्टीने ठोस कार्यवाही करुन १००% वसुली करुन पूर्तता अनुपालन दाखवावे. | पंचायत समिती मंडणगड गटाकडील ४९ ग्रामपंचायत अंतर्गत सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये पाणीपट्टीची मागणी रु. ७१३९८३८/- असून ३१ मार्च २०१८ अखेर रु. ५३१०७५१/- वसूल झालेली आहे. व रु. १८२९०८७/- थकित असून थकित रक्कमेपैकी सन २०१८-२०१९ आर्थिक वर्षामध्ये ११८९३२०/- रक्कम वसूल झालेली असून शिल्लक रक्कम रुपये ६३९७६७/- वसूल पात्र रक्कमेचा सन २०१९-२०२० च्या मागणीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.<br>सदर वसूली १००% ग्रामपंचायत स्तरावरुन करण्यात येत आहे. |

**पंचायत समिती सभा दिनांक १९/०७/२०१९**
**पंचायत समिती ठराव क्रमांक**

| ठराव व दिनांक | प्रस्तावाचा विषय | पंचायत समिती ठराव |
|---|---|---|
| दिनांक २३/०७/२०१९<br>ठराव क्रमांक : १६० | वार्षिक प्रशासन अहवाल सन २०१८-१९ ला मंजूरी देणे | पंचायत समिती मंडणगडचा सन २०१८-१९ (प्रकरण १ ते ७) सभागृहाला वाचून दाखविणेत आले. त्यावर चर्चा होवून जि. प. व पं. स. अधिनियम १९६१ चे कलम १४२ व त्यावरील सुधारीत नियमानुसार प्रशासन अहवालास मंजूरी देण्यात आली. |